शै. व. २०१०-११ पासून वास्तुकला परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नविन वास्तुशास्त्र महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

## महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**

शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१०/(११५/१०)/तांशि-४,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : १५ जून, २०१०.

संदर्भः- वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.
क्र. CA/५/Academic-MH ५०, दिनांक १० जून, २०१० चे पत्र.

**शासन निर्णयः-** वास्तुकला परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१०-११ करिता खाली नमूद केलेल्या संस्थेस नविन वास्तुशास्त्र महाविद्यालय सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | आर्ट डेव्हलपमेंट ॲकेडेमीचे मिनर्व्हा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे | वास्तुशास्त्र पदवी Bachelor of Architecture | ४० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून नविन वास्तुशास्त्र महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत वास्तुकला परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच वास्तुकला परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापिठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापिठांची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

(कृपया मागे पहा.)

ADA's MINERVA COLLEGE OF ARCHITECTURE MH-50

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
संबंधित संस्था (संचालकांमार्फत)
प्रत माहितीसाठी
रजिस्ट्रार, वास्तुकला परिषद, इंदिरा हॅबीटेट सेंटर कोअर-६ए, १ ला माळा, लोधी रोड, नवी दिल्ली ११० ००३

C:\Documents and Settings\m\My Documents\Lole\TE\GR 2009-10\New Arch 2009-10.doc

020. 25675011